कोष्टकांशी सुसंगती साधण्यासाठी आलेख संबंधित
कोष्टकांच्या डाव्या बाजूस लावला आहे.

## आलेख क्रमांक - ५.०८

## मुख्याध्यापकांच्या एकूण अध्यापन अनुभवाची सरासरी



**कोष्टक क्रमांक - ५.५३**

**मुख्याध्यापकांच्या एकुण अध्यापन अनुभवाची सरासरी**

| अ. नं. | अनुभवाचे वर्गांतर | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ० ते ५ | ०८ | ३३.३३% |
| २. | ६ ते १० | ०७ | २९.१६% |
| ३. | ११ ते १५ | ०३ | १२.५०% |
| ४. | १६ ते २० | ०६ | २५.००% |
| ५. | २१ ते २५ | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.५३ वरून असे दिसून येते की, मुख्याध्यापकांच्या अध्यापन अनुभवाची सरासरी पुढील प्रमाणे -

मध्यामान = गृहीत मध्यामन + सुधारणा × वर्गांतर लांबी

= १३.५ + ( + ०.६२ ) × ५

= १३.५ + ३.१

= १६.६

= १७

यावरुन असे दिसून येते की, मुख्याध्यापक जास्तीत जास्त अनुभव १७ वर्षे इतका आहे.अध्यापन अनुभव जास्त असल्यामुळे क्षमताधिष्ठित शिक्षण अभ्यासक्रमावर त्याचा योग्य परिणाम होतो. ही बाब संशोधकांच्या दृष्टीने समाधानकारक आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १० मध्ये आपण दहा वर्षात कोणते प्रशिक्षण पूर्ण केले आहे ? असा प्रश्न विचारला होता. याबाबत मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.५४ मध्ये दर्शविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.५४**

**प्रशिक्षणाबाबत मुख्याध्यापक प्रतिसाद**

| अ. नं. | प्रशिक्षणाचे स्वरुप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण | ०३ | १२.५०% |
| २. | एन्.सी. ई. आर. टी. | ०० | ०% |
| ३. | गणित / विज्ञान | ०७ | २९.१६% |
| ४. | स्मार्ट पी. टी. | २२ | ९१.६६% |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | क्षमताधिष्ठित प्रशिक्षण | २४ | १००% |
| ६. | सॉफ्ट कोर्स | ०३ | १२.५००% |
| ७. | इतर | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.५४ वरुन असे दिसून येते की, ' क्षमताधिष्ठित प्रशिक्षण ' हे प्रशिक्षण झालेल्या मुख्याध्यापकांनी १००% प्रतिसाद दिला. ' स्मार्ट पी. टी. ' ९१.६६% प्रतिसाद दिला.' गणित / विज्ञान ' यास २९.१६% व ' नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ' १२.५०% व ' सॉफ्ट कोर्स ' १२.५०% मुख्याध्यापकांनी प्रतिसाद दिला.

यावरुन संशोधकास असे वाटते की, क्षमताधिष्ठित अध्यापनाची कार्यवाही होण्यासाठी एकाही मुख्याध्यापकास प्रशिक्षणाची आवश्यकता नको असे वाटत नाही. प्रशिक्षणामुळे ज्ञान अद्ययावत राहते व मुख्याध्यापकाच्या ज्ञानात भर पडते. त्यामुळे मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण झाले आहे ही बाब समाधानकारक आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ११ मध्ये क्षमताधिष्ठित इयत्ता शिकविलेला अनुभव आहे का ? असा प्रश्न विचारला होता. याबाबत मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.५५ मध्ये दर्शविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.५५**

**क्षमताधिष्ठित इयत्ता शिकविल्याचा अनुभव**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | २४ | १००% |
| २. | नाही. | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.५५ वरुन असे दिसून येते की, क्षमताधिष्ठित इयत्तांना शिकविण्याचा अनुभव सर्वच मुख्याध्यापकांना आहे. ही बाब संशोधकाच्या दृष्टीने समाधानकारक आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १२ मध्ये कोणत्या इयत्ता शिकविल्या ? हा प्रश्न विचारला होता. याबाबतचा मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.५६ मध्ये दर्शविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.५६

## इयत्तावार मुख्याध्यापकांचा अनुभव

| अ. नं. | इयत्ता | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | इयत्ता १ ली | २३ | ९५.८३% |
| २. | इयत्ता २ री | २० | ८३.३३% |
| ३. | इयत्ता ३ री | ०८ | ३३.३३% |
| ४. | इयत्ता ४ थी | २३ | ९५.८३% |
| ५. | इयत्ता ५ वी | १६ | ६६.६६% |

कोष्टक क्रमांक - ५.५६ वरुन असे दिसून येते की, ' इयत्ता १ ली ' शिकविण्याचा अनुभव ९५.८३% मुख्याध्यापकांना आहे. ' इयत्ता ४ थी ' शिकविण्याचा अनुभव ९५.८३% एवढा आहे. ' इयत्ता २री ' शिकविण्याचा अनुभव ८३.३३% एवढा व ' इयत्ता ५ वी ' शिकविण्याचा अनुभव ६६.६६% आणि ' इयत्ता ३ री ' शिकविण्याचा अनुभव ३३.३३% मुख्याध्यापकांना आहे.

संशोधकास असे वाटते की, क्षमताधिष्ठित इयत्ता शिकविण्याचा अनुभव मुख्याध्यापकांकडे आहे ही बाब समाधानकारक आहे. त्याशिवाय क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमाची कार्यवाही परिणामकारक होणार नाही.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १३ मध्ये सामान्य प्रश्नपत्रिकामुळे काही समस्या निर्माण होतात का ? असा प्रश्न विचारला होता. याबाबत मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.५७ मध्ये दर्शविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.५७

## सामान्य प्रश्नपत्रिकामुळे निर्माण होणाऱ्या समस्या

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | २४ | १००% |
| २. | नाही. | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.५७ मध्ये असे दिसून येते की, ' सामान्य प्रश्नपत्रिकामुळे मुख्याध्यापकांना समस्या निर्माण होतात.' या समस्येला मुख्याध्यापकांनी १००% प्रतिसाद दिला आहे. त्यावरुन संशोधकास असे वाटते की, सामान्य प्रश्नपत्रिकेमुळे जिल्हापरिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक, मुख्याध्यापकांना समस्या जाणवतात. त्यामुळे सामान्य प्रश्नपत्रिका ऐवजी मुख्याध्यापकांनी शालेय स्तरावर प्रश्नपत्रिका काढाव्यात.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १४ मध्ये सामान्य प्रश्नपत्रिकामुळे कोणत्या समस्या निर्माण होतात ? असा प्रश्न विचारला होता. याबाबत मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.५८ मध्ये दर्शविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.५८**

**सामान्य प्रश्नपत्रिकामुळे निर्माण होणाऱ्या समस्या**

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रश्नपत्रिकेमुळे स्वायत्ता राहात नाही. | २३ | ९५.८३% |
| २. | सामान्य प्रश्नपत्रिकात लवचिकता नसते. | २२ | ९१.६६% |
| ३. | छपाईत अनेक दोष असतात. | २४ | १००% |
| ४. | सामान्य प्रश्नपत्रिकेत काठिण्य पातळीचा विचार नसतो. | १९ | ७९.१६% |
| ५. | सामान्य प्रश्नपत्रिकेमुळे शिक्षक, विद्यार्थी आहारी जातात. | २० | ८३.३३% |
| ६. | इतर | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.५८ वरुन असे दिसून येते की, ' छपाईत अनेक दोष असतात' या समस्येला १००% मुख्याध्यापकांनी प्रतिसाद दिला आहे. ' सामान्य प्रश्नपत्रिकामुळे स्वायत्ता रहात नाही ' व ' सामान्य प्रश्नपत्रिकात ( मुख्या. शाळेत अजिबात ) लवचिकता नसते. ' या समस्येस अनुक्रमे ९५.८३% व ९१.६६% प्रतिसाद मुख्याध्यापकांनी दिला.

' सामान्य प्रश्नपत्रिकामुळे शिक्षक, विद्यार्थी आहारी जातात.' यास ८३.३३% मुख्याध्यापकांनी प्रतिसाद दिला. तसेच ' सामान्य प्रश्नपत्रिकेत कठिण्य पातळीचा विचार नसतो ' या समस्येला ७१.१६% प्रतिसाद दिला.

संशोधकास असे वाटते की, सामान्य प्रश्नपत्रिकेमुळे अनेक समस्या निर्माण होतात. छपाईत अनेक दोष आढळतात. व त्यात स्वायत्ता राहत नाही त्यामुळे सामान्य प्रश्नपत्रिकांच्या सर्व बाबी विचार करून, सामान्य प्रश्नपत्रिकेतील त्रुटी दूर करुन त्यांचा वापर सर्व मुख्याध्यापकांनी करावा.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १५ मध्ये अध्यापनात शैक्षणिक साधनांचा सुनियोजित वापर होण्यासाठी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस कोणकोणते पूर्वनियोजन असावे असे आपणास वाटते ? असा प्रश्न विचारला होता. याबाबत मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.५९ मध्ये दर्शविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.५९**

**अध्यापनात शैक्षणिक साधनांच्या सुनियोजित वापराबाबत पूर्वनियोजन**

| अ. नं. | शै. साधनांच्या पूर्व नियोजनाबाबत | प्रतिसादक मुख्याध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| अ. | घटक, पाठ, वार्षिक नियोजन करताना त्या नियोजनात अध्यापनात शैक्षणिक साधनांचा समावेश करणे. | २४ | १००% |
| ब. | शैक्षणिक साधन निर्मिती सप्ताह | २० | ८३.३३% |
| क. | शाळा सुरु झाल्यावर पहिल्या आठवड्यात वर्ग सजावट करुन घेणे. | २४ | १००% |
| ड. | आवश्यक साधन सामुग्री खरेदी | २४ | १००% |

कोष्टक क्रमांक - ५.५९ वरुन असे दिसून येते की, ' घटक नियोजन , पाठ नियोजन, वार्षिक नियोजन करताना त्या नियोजनात अध्यापन शैक्षणिक साधनांचा समावेश करणे ' व ' शाळा सुरु झाल्यावर पहिल्या आठवड्यात वर्ग सजावट करुन घेणे ' आणि ' आवश्यक साधन साम्रुगी खरेदी करणे ' या समस्यांना १००% मुख्याध्यापकांचा प्रतिसाद मिळाला.

' शैक्षणिक साधन निर्मिती सप्ताह ' ८३.३३% प्रतिसाद मिळाला. यावरुन संशोधमास असे वाटते की, शैक्षणिक साधने निर्मिती व वापराविषयी वर्षाच्या सुरुवातीस सर्व शिक्षकांना मुख्याध्यापकांनी त्यांच्याकडून सुनियोजन करुन घ्यावे. खरे पाहता सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळात आवश्यक साधनसामुग्री जास्तीत जास्त प्रमाणात खरेदी करावी.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १६ मध्ये क्षमताधिष्ठित विषयाचे अध्यापनाचे टाचण दैनंदिन असावे का ? असा प्रश्न विचारला होता. याबाबत मुख्याध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.६० मध्ये दर्शविलेला आहे.